# कॉरूगेटेड बॉक्स उत्पादकांपुढे अनिवार्य बंदीचा धोका

**पुणे :** क्राफ्ट पेपर मिल्स आणि मोठ्या ग्राहकांच्या कचाट्यात सापडलेला कॉरूगेटेड पॅकेजींग उद्योग पुन्हा एका भयाण अवस्थेत सापडला आहे. या उद्योगाचा महत्वाचा कच्चा माल म्हणजे कॉफ्ट पेपरमध्ये नुकतीच बहुपरिणामी, प्रतिबंधात्मक आणि अभूतपूर्व अशी दरवाढ झाली आहे. त्यामुळे कॉरूगेटेड पॅकेजींग तब्बल २५ टक्क्यांनी महागले असून पेपर मिल्स येणाऱ्या काही आठवड्यांमध्ये आता आणखीही दरवाढ करण्याच्या बेतात आहेत.

या परिस्थितीत आणखी भर म्हणून या उद्योगातील इतरही काही निर्णायक गोष्टींच्या किंमतींमध्ये फारच मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. गेल्या एका वर्षभरात स्टार्चच्या किंमती तब्बल दुपटीने वाढल्या आहे. शिवण्याच्या दोरीच्या किमतीही साधारण ४० टक्क्यांनी वाढल्या आहेत आणि स्टीलच्या वाढलेल्या किमती हे त्यामागचे प्रमुख कारण आहे. त्याशिवाय लेबरच्या किमतीतही मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे.

एक गोष्ट इथे प्रकर्षाने नमूद करावीशी वाटते की सर्वसामान्य माणसांच्या दैनदिन आयुष्यातील जवळजवळ सर्वच उत्पादनांची वाहतूक आणि त्यांचे वितरण यासाठी कॉरूगेटेड पॅकेजींगची गरज असते. मग ते दूध असो, फळे असोत कि भाजीपाला, इंजिनियरिंग वस्तू, वस्त्रोद्योग, कन्झुमर ड्युरेबल्स की औषधे काहीही असो, सर्वांसाठी ते गरजेचे असते. हा उद्योग संपूर्णतः पुनर्वापरातील फायबरवर आधारीत आहे आणि देशातील पॅकेजींगच्या गरजांची तो पूर्णता करत आला आहे. लाकडी पॅकेजींगला यशस्वी पर्याय ठरत हा पॅकेजींग उद्योग पर्यावरण संरक्षण आणि पर्यावरणासाठी समतोल याबाबतीत अत्यंत महत्वाची कामगिरी पार पाडतो आहे.

कॉरूगेटेड पॅकेजींग उद्योग हा प्राथमिकतः छोट्या आणि मध्यम क्षेत्रांमध्ये कार्यरत असतो. आता तर एकीकडे कॉफ्ट पेपरच्या किमतींमध्ये जी वाढ झाली आहे तर दुसरीकडे इतर आवश्यक गोष्टींच्या वाढीच्या प्रचंड दबावाखाली तो आला आहे.

इंडियन कॉरूगेटेड केस मॅन्युफॅक्चरर्स असोशिएशन (आयसीसीएमए)चे अध्यक्ष श्री किरीट मोदी म्हणाले, 'आतापर्यंतच्या फ्रॅगमेंटेड मॅन्युफॅक्चरींग प्रक्रियेमध्ये सुधारणा करून देशात नुकतीच आधुनिक आणि नवीन तंत्रज्ञान दाखल केले गेले आहे. त्यातून संपूर्णतः ऑटोमॅटीक पद्धतीने निर्मिती केली जाते आणि पॅकेजींग उद्योगामध्ये जगभरात तोच मापदंड आहे. या उद्योगातील एक विभाग इंडियन कॉरूगेटेड केस मॅन्युफॅक्चरर्स असोशिएशन या बॅनरखाली एकत्र आली आहे. भारतीय बाजारपेठेमध्ये हे आधुनिक तंत्रज्ञान दाखल करण्यासाठी ज्या युनीट्सनी नुकतीच महत्वपूर्ण गुंतवणूक केली आहे त्यांचे प्रतिनिधीत्व आयसीसीएमए करते'.